# संसदीय कामकाजाची घसरण : भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

**डॉ.सचिन महादेव पाटील** श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

---

**प्रस्तावना**

भारतीय संसद ही भारताच्या लोकशाही व्यवस्थेतील सर्वोच्च आणि महत्त्वपूर्ण संस्था आहे. ती भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सर्वोच्च विधिमंडळ असून कायदेनिर्मिती, कार्यपालिकेवर नियंत्रण, आर्थिक उत्तरदायित्व निश्चित करणे आणि नागरिकांच्या प्रश्नांना शासनापर्यंत पोहोचविणे ही महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडते. भारतीय संविधान निर्मात्यांनी जगातील विविध संविधानांचा अभ्यास करून भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीला अनुरूप अशी संसदीय शासनव्यवस्था स्वीकारली.

भारतामध्ये लोकसहभाग आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेची परंपरा प्राचीन काळापासून आढळते. ऋग्वेदामध्ये 'सभा' आणि 'समिती' या लोकसहभागाशी संबंधित संस्थांचा उल्लेख आढळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, 'बौद्ध काळातील बौद्ध संघाची निर्णय प्रक्रिया, चर्चा आणि नियमबद्ध कार्यपद्धती ही आधुनिक संसदीय प्रक्रियेशी साधर्म्य दर्शविणारी होती'. त्यामुळे भारतामध्ये लोकशाही विचारांची परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारताने सार्वभौम, लोकशाही गणराज्य म्हणून आपली वाटचाल सुरू केली. संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि लोकशाही सहभागाची संधी उपलब्ध करून दिली. मात्र लोकशाही व्यवस्था केवळ संविधानिक तरतुदींवर टिकून राहत नाही, तर तिच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संविधानिक नैतिकता, संसदीय संकेतांचे पालन, विरोधकांचा सन्मान, मतभिन्नतेचा आदर, सहिष्णुता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संसदीय परंपरांचा आदर या मूल्यांची आवश्यकता असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेतील आपल्या भाषणात संविधानिक नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले होते. त्यांच्या मते, लोकशाहीचे यश हे केवळ संविधानावर अवलंबून नसून ते राबविणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या वृत्तीवरही अवलंबून असते**.** त्यामुळे लोकप्रतिनिधींनी लोकशाही मूल्यांचे पालन करणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. भारतीय संसद स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात तिच्या कामकाजाची गुणवत्ता, सखोल चर्चा आणि अभ्यासपूर्ण वादविवाद यासाठी तिची प्रशंसा केली जात होती. मात्र कालांतराने संसदीय कामकाजाच्या गुणवत्तेत काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. संसदेच्या बैठकींच्या दिवसांमध्ये झालेली घट, विधेयकांवरील मर्यादित चर्चा, संसदीय समित्यांकडे विधेयके पाठविण्याचे कमी होत जाणारे प्रमाण, प्रश्नोत्तराच्या तासातील व्यत्यय, विरोधी पक्षाच्या भूमिकेतील कमकुवतपणा आणि संसदीय कामकाजादरम्यान होणारे वारंवार व्यत्यय या बाबी चिंतेचा विषय ठरत आहेत.

१९७५ मधील आणीबाणीच्या कालखंडानंतर भारतीय लोकशाही संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत व्यापक चर्चा सुरू झाली. त्यानंतरच्या काळात विविध राजकीय, सामाजिक आणि संस्थात्मक कारणांमुळे संसदीय लोकशाहीसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली. तथापि, भारतीय लोकशाहीने अनेक संकटांवर मात करत आपली संस्थात्मक क्षमता कायम ठेवली आहे.

संसदीय लोकशाहीमध्ये बहुमताला शासन करण्याचा अधिकार असला तरी बहुमताच्या आधारे चर्चा, विचारविनिमय आणि विरोधी मतांकडे दुर्लक्ष करणे ही लोकशाहीच्या मूलभूत भावनेशी विसंगत बाब ठरू शकते. विधेयके पुरेशा चर्चेविना मंजूर होणे, अध्यादेशांचा वाढता वापर, संसदीय समित्यांच्या भूमिकेकडे होणारे दुर्लक्ष, प्रश्नोत्तराच्या तासाचे कमी होत जाणारे महत्त्व आणि सभागृहातील वारंवार होणारे व्यत्यय या बाबींमुळे संसदीय कामकाजाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे संसदीय लोकशाही मजबूत करण्यासाठी केवळ संविधानिक तरतुदी पुरेशा नसून लोकप्रतिनिधींची संविधानिक बांधिलकी, राजकीय सुसंस्कृतपणा, संस्थात्मक सुधारणा आणि संसदीय परंपरांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. भारतीय संसदीय कामकाजातील बदलत्या प्रवृत्ती, कामकाजातील घसरण, त्यामागील कारणे, त्याचे लोकशाही व्यवस्थेवरील परिणाम आणि आवश्यक सुधारणा यांचे सखोल विश्लेषण करण्यासाठी गुणात्मक संशोधन दृष्टिकोन (Qualitative Research Approach) स्वीकारण्यात आला आहे.

या संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम माहिती स्रोतांचा (Secondary Data Sources) वापर करण्यात आला आहे. संसदेच्या कामकाजाशी संबंधित अधिकृत अहवाल, लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयाची कागदपत्रे, संसदीय समित्यांचे अहवाल, PRS Legislative Research चे अहवाल, Association for Democratic Reforms (ADR)

चे अहवाल, इंटर-पार्लमेंटरी युनियन (IPU) चे अहवाल, विविध संशोधन लेख, पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे आणि अधिकृत संकेतस्थळांवरील माहितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

अभ्यासामध्ये संसदेच्या बैठकींची संख्या, संसदीय चर्चेचा कालावधी, समित्यांकडे पाठविण्यात आलेल्या विधेयकांचे प्रमाण, प्रश्नोत्तराच्या तासाची कार्यक्षमता, खासदारांची उपस्थिती आणि लोकप्रतिनिधींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीशी संबंधित उपलब्ध आकडेवारीचे तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीने परीक्षण करण्यात आले आहे.

या संशोधनाचा अभ्यासकाल प्रामुख्याने पहिल्या लोकसभेपासून अठराव्या लोकसभेपर्यंत (1952–2024) मर्यादित असून, विशेषतः पंधरावी, सोळावी, सतरावी आणि अठरावी लोकसभा यांच्या कामकाजाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे:**

1. भारतीय संसदेच्या कामकाजातील बदलत्या प्रवृत्तींचा आणि कामकाजाच्या घटत्या गुणवत्तेचा अभ्यास करणे.
2. संसदीय चर्चा, समिती व्यवस्था, प्रश्नोत्तराचा तास आणि सदस्यांच्या उपस्थितीचा कायदेनिर्मिती प्रक्रियेवरील प्रभावाचे विश्लेषण करणे.
3. संसदीय लोकशाहीच्या कार्यक्षमतेवर राजकीय, संस्थात्मक आणि नैतिक घटकांचा परिणाम तपासणे.
4. भारतीय संसदीय लोकशाही अधिक प्रभावी, उत्तरदायी आणि पारदर्शक करण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचविणे.

***1.विरोधी पक्षाची कमकुवत होत जाणारी भूमिका***

लोकशाही व्यवस्थेमध्ये विरोधी पक्ष हा संसदीय कार्यपद्धतीचा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. विरोधी पक्षाची भूमिका केवळ सत्ताधारी पक्षाला विरोध करण्यापुरती मर्यादित नसून सरकारच्या धोरणांचे चिकित्सक परीक्षण करणे, जनतेच्या समस्या सभागृहात मांडणे आणि शासनाला उत्तरदायी ठेवणे ही त्याची मूलभूत जबाबदारी असते. संसदीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षाला बहुमताच्या आधारे शासन करण्याचा अधिकार असतो; परंतु त्या अधिकारावर लोकशाही पद्धतीने नियंत्रण ठेवण्याचे कार्य विरोधी पक्ष पार पाडतो. सरकारच्या चांगल्या धोरणांना सहकार्य करणे आणि धोरणांमधील त्रुटी निदर्शनास आणून, त्यामध्ये सुधारणा सुचविणे ही रचनात्मक विरोधी पक्षाची ओळख मानली जाते. विरोधी पक्ष संसदेत विविध माध्यमांतून सरकारच्या कामकाजाचे परीक्षण करतो. प्रश्नोत्तराचा तास, चर्चासत्रे, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव आणि संसदीय समित्यांच्या माध्यमातून तो सरकारला जनतेच्या प्रश्नांबाबत उत्तरदायी ठेवण्याचा प्रयत्न करतो. महागाई, बेरोजगारी, महिला सुरक्षा, शेतकऱ्यांच्या समस्या, सामाजिक असमानता आणि आर्थिक प्रश्न यांसारख्या विषयांना संसदेत स्थान मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विरोधी पक्ष करतो.

मात्र अलीकडील काळात विरोधी पक्षाच्या कार्यक्षमतेबाबत काही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विरोधी पक्षातील अंतर्गत मतभेद, नेतृत्वाचा अभाव, राजकीय रणनीतीतील विसंगती आणि संसदीय कामकाजातील मर्यादित सहभाग यामुळे त्याची भूमिका अपेक्षेइतकी प्रभावी राहिली नसल्याची टीका केली जाते. काही प्रसंगी विरोधी पक्षाकडून केवळ विरोधासाठी विरोध केला जात असल्याचे दिसून येते, तर काही वेळा जनहिताच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर सातत्यपूर्ण आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडण्यात मर्यादा येतात. यामुळे संसदेतील धोरणात्मक चर्चा आणि सरकारवरील प्रभावी नियंत्रणाची प्रक्रिया कमजोर होऊ शकते. तथापि, संसदीय लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्षम आणि जबाबदार विरोधी पक्ष आवश्यक आहे. सत्ताधारी पक्षाच्या निर्णयांचे परीक्षण करणारा, पर्यायी धोरणे मांडणारा आणि जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडणारा विरोधी पक्ष हा लोकशाहीच्या संतुलनासाठी अत्यावश्यक घटक आहे.

2.**संसदीय चर्चेतील घट**

संसदीय लोकशाहीचा आत्मा हा चर्चा, विचारविनिमय आणि मतभेदांमधून सहमती निर्माण करण्याच्या प्रक्रियेत असतो**.** संसदेत सादर होणाऱ्या प्रत्येक विधेयकावर सखोल चर्चा होणे, विविध मतांचा विचार होणे आणि त्यानंतर कायद्याची निर्मिती होणे ही लोकशाही शासनव्यवस्थेची मूलभूत प्रक्रिया आहे. संसद हे असे व्यासपीठ आहे जिथे सरकारच्या धोरणांचे परीक्षण केले जाते आणि त्याला त्याच्या निर्णयांसाठी उत्तरदायी ठरविले जाते. लोकप्रतिनिधींना जनतेच्या समस्या, आकांक्षा आणि अपेक्षा सभागृहात मांडण्याची संधी संसद उपलब्ध करून देते. त्यामुळे संसदीय चर्चा ही केवळ औपचारिक प्रक्रिया नसून लोकशाही शासनव्यवस्थेतील नियंत्रण आणि संतुलनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे.

मात्र अलीकडील काळात भारतीय संसदेतील चर्चेच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. अनेकदा सभागृहातील गोंधळ, वारंवार होणारे व्यत्यय, कामकाज स्थगित होणे आणि मर्यादित चर्चेद्वारे विधेयके मंजूर होणे या

कारणांमुळे संसदीय चर्चेची प्रभावीता कमी होत असल्याचे दिसून येते. लोकशाहीमध्ये मतभिन्नता ही नैसर्गिक आणि आवश्यक बाब आहे. मात्र मतभेदांचे रूपांतर सातत्यपूर्ण व्यत्ययामध्ये झाल्यास संसदीय कामकाजाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. पूर्वी संसदेमध्ये विधेयकांवर तज्ज्ञांच्या मतांचा विचार, सविस्तर चर्चा आणि विविध दृष्टिकोनांचा समावेश केला जात असे. परंतु अलीकडील काळात काही महत्त्वाची विधेयके मर्यादित चर्चेनंतर मंजूर झाल्याची उदाहरणे आढळतात.

***3.संसदेच्या कामकाजाच्या दिवसांमध्ये घट***

संसदेचे प्रभावी कामकाज होण्यासाठी पुरेसा वेळ उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र गेल्या काही दशकांमध्ये संसद भरविण्याच्या दिवसांमध्ये सातत्याने घट झाल्याचे दिसून येते.

| **लोकसभा** | **कालावधी** | **वर्षाला सरासरी बैठक दिवस** |
|---|---|---|
| पहिली लोकसभा | १९५२–१९५७ | १३५ दिवस |
| पंधरावी लोकसभा | २००९–२०१४ | ६८ दिवस |
| सोळावी लोकसभा | २०१४–२०१९ | ६६.५ दिवस |
| सतरावी लोकसभा | २०१९–२०२४ | ५५ दिवस |

वरील आकडेवारीवरून स्पष्ट होते की पहिल्या लोकसभेच्या तुलनेत अलीकडील लोकसभांच्या बैठकींच्या दिवसांमध्ये मोठी घट झाली आहे. यामुळे संसदेला विधेयकांचे परीक्षण, धोरणांवरील चर्चा आणि सरकारच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी उपलब्ध वेळ कमी झाला आहे.

***4.विधेयकांच्या संसदीय परीक्षणातील घट***

संसदीय समित्या या विधेयकांचे सखोल परीक्षण करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहेत. समित्यांमध्ये तज्ज्ञांचे मत, विविध भागधारकांचे विचार आणि तांत्रिक बाबींचा अभ्यास करून विधेयक अधिक प्रभावी बनविण्याची संधी मिळते. मात्र अलीकडील काळात विधेयके संसदीय समित्यांकडे पाठविण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

- चौदाव्या लोकसभेत सुमारे ६० टक्के विधेयके संसदीय समित्यांकडे पाठविण्यात आली होती.
- पंधराव्या लोकसभेत हे प्रमाण सुमारे ७१ टक्के होते.
- सतराव्या लोकसभेत हे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले.

यामुळे कायदेनिर्मिती प्रक्रियेमध्ये सखोल परीक्षण आणि व्यापक चर्चा करण्याची संधी कमी झाल्याची टीका केली जाते.

***परिणाम***

संसदीय चर्चेतील घट आणि कामकाजाच्या दिवसांतील कपातीचे पुढील परिणाम दिसून येतात:

१. कायद्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता वाढते.

२. विरोधी पक्ष आणि इतर सदस्यांना आपली मते मांडण्यासाठी कमी वेळ मिळतो.

३. सरकारच्या धोरणांचे प्रभावी परीक्षण कमी होते.

४. जनतेच्या विविध प्रश्नांना संसदेत पुरेसे स्थान मिळत नाही.

५. संसदीय लोकशाहीतील संवाद आणि सहमती निर्माण करण्याची प्रक्रिया कमजोर होते.

5. **संसदीय समित्यांचे घटते महत्त्व**

संसदीय समित्या या भारतीय संसदीय व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाच्या संस्था आहेत. त्या संसदेला अधिक प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि उत्तरदायी बनविण्याचे कार्य करतात. संसदेमध्ये सादर होणाऱ्या विधेयकांचे सखोल परीक्षण करणे, तज्ज्ञांचे मत जाणून घेणे, विविध भागधारकांशी संवाद साधणे आणि शासनाच्या धोरणांचे मूल्यमापन करणे ही संसदीय समित्यांची प्रमुख कार्ये आहेत. संसदीय समित्यांना अनेकदा "संसदेचे सूक्ष्म रूप (Mini Parliament)" असे संबोधले जाते. कारण सभागृहातील राजकीय मतभेदांपेक्षा समित्यांमध्ये तुलनेने अधिक सखोल आणि तांत्रिक चर्चा होण्याची संधी उपलब्ध होते.

भारतामध्ये एखादे विधेयक संसदीय समितीकडे पाठविणे अनिवार्य नाही. विधेयक समितीकडे पाठवायचे की नाही याचा निर्णय लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभा सभापती संबंधित सभागृहातील परिस्थिती आणि सदस्यांच्या मतांनुसार घेतात. त्यामुळे समितीकडे विधेयके पाठविण्याची प्रक्रिया ही अनिवार्य नसल्याने अनेकदा महत्त्वाची विधेयके थेट संसदेत मंजूर केली जातात.

अलीकडील काळात विधेयके संसदीय समित्यांकडे पाठविण्याच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. सतराव्या लोकसभेच्या (२०१९–२०२४) काळात एकूण १७९ विधेयकांपैकी केवळ मर्यादित प्रमाणातील विधेयके संसदीय समित्यांकडे पाठविण्यात आली. हे प्रमाण मागील काही लोकसभांच्या तुलनेत कमी होते. यामुळे विधेयकांवर तज्ज्ञांच्या माध्यमातून सखोल परीक्षण, विविध हितधारकांचे मत जाणून घेणे आणि कायद्याच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्याची प्रक्रिया मर्यादित झाली आहे. काही महत्त्वाची विधेयके संसदीय समित्यांकडे न पाठविता थेट संसदेत मंजूर करण्यात आली. यामध्ये:

- राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग विधेयक, २०१४
- जम्मू आणि काश्मीर पुनर्घटन विधेयक, २०१९
- महिला आरक्षण विधेयक, २०२३

यांसारख्या विधेयकांचा समावेश होतो.

**संसदीय समित्यांच्या कार्यक्षमतेतील घट**

केवळ विधेयके समित्यांकडे पाठविण्याचे प्रमाण कमी झाले नाही, तर समित्यांच्या कामकाजाच्या वेळेत आणि बैठकींच्या संख्येतही घट झाल्याचे दिसून येते. सतराव्या लोकसभेच्या काळात (२०१९–२०२४) संसदीय समित्यांच्या बैठकींचा सरासरी कालावधी सुमारे दोन तासांच्या आसपास होता. यापूर्वीच्या लोकसभांच्या तुलनेत समित्यांच्या कामकाजासाठी उपलब्ध वेळ कमी झाला आहे.

पंधराव्या लोकसभेच्या काळात (२००९–२०१४) प्रत्येक अहवालासाठी सरासरी एक ते दोन बैठका घेतल्या जात असत आणि समित्यांच्या कामकाजाचा कालावधी तुलनेने अधिक होता. समित्यांना पुरेसा वेळ न मिळाल्यास विधेयकांचे प्रभावी परीक्षण आणि धोरणांचे सखोल विश्लेषण करण्याची क्षमता कमी होते.

**6.समित्यांच्या बैठकीतील सदस्य उपस्थितीची समस्या**

संसदीय समित्यांच्या प्रभावी कार्यासाठी सदस्यांची नियमित उपस्थिती अत्यंत आवश्यक असते. मात्र समिती बैठकीतील खासदारांच्या उपस्थितीचे प्रमाण समाधानकारक नसल्याचे विविध अभ्यासांमधून दिसून आले आहे. २००९ ते २०१४ या कालावधीत समिती बैठकींमध्ये सदस्यांची सरासरी उपस्थिती सुमारे ४९ टक्के होती. पंधराव्या लोकसभेत अनेक समित्यांमध्ये नियमित उपस्थितीचे प्रमाण मर्यादित राहिले. सतराव्या लोकसभेच्या काळात विभाग-संबंधित स्थायी समित्यांच्या बैठकींमध्ये सदस्य उपस्थितीमध्ये घट दिसून आली. दुसऱ्या अधिवेशनात उपस्थिती सुमारे ५४ टक्के होती, तर तिसऱ्या अधिवेशनात ती सुमारे ४८ टक्क्यांपर्यंत खाली आली.

**परिणाम**

संसदीय समित्यांच्या घटत्या प्रभावामुळे पुढील परिणाम दिसून येतात:

१. विधेयकांचे तांत्रिक आणि कायदेशीर परीक्षण मर्यादित होते.

२. तज्ज्ञ आणि संबंधित घटकांचा सहभाग कमी होतो.

३. कायद्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता वाढते.

४. संसदेमधील अभ्यासपूर्ण चर्चेची प्रक्रिया कमजोर होते.

५. सरकारच्या धोरणांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी होते.

**7.प्रश्नोत्तराच्या तासाचे घटते महत्त्व**

संसदीय लोकशाहीमध्ये प्रश्नोत्तराचा तास (Question Hour) हा सरकारला उत्तरदायी ठेवण्याचे सर्वात प्रभावी संसदीय साधन मानले जाते. संसदेमध्ये सदस्यांना प्रशासनाच्या विविध बाबींवर प्रश्न विचारण्याची आणि संबंधित मंत्र्यांकडून माहिती व स्पष्टीकरण मिळविण्याची संधी प्रश्नोत्तराच्या तासाद्वारे उपलब्ध होते. प्रश्नोत्तराचा तास हा केवळ संसदीय प्रक्रियेचा भाग नसून लोकशाहीतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनप्रतिनिधित्वाचे प्रभावी माध्यम आहे. संसदीय शासन प्रणालीमध्ये सरकार आपली वैधता संसदेमधील बहुमतावर आधारित प्राप्त करते आणि त्यामुळे ते संसदेला उत्तरदायी असते. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मंत्र्यांना त्यांच्या विभागाच्या कामकाजाबाबत माहिती द्यावी लागते आणि प्रशासनातील त्रुटी, धोरणात्मक

अडचणी किंवा जनतेशी संबंधित समस्या सभागृहासमोर येतात. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान विचारले जाणारे प्रश्न विविध प्रकारचे असतात. तारांकित प्रश्नांद्वारे तोंडी उत्तर मिळते आणि त्यावर पूरक प्रश्न विचारण्याची संधी सदस्यांना मिळते. अतारांकित प्रश्नांना लेखी उत्तर दिले जाते. या प्रक्रियेमुळे शासनाच्या निर्णयांवर आणि धोरणांवर प्रभावी चर्चा होण्यास मदत होते.

मात्र अलीकडील काळात संसदीय कामकाजातील वारंवार होणारे व्यत्यय, सभागृहातील गोंधळ आणि कामकाज स्थगित होण्याच्या घटनांमुळे प्रश्नोत्तराच्या तासाच्या प्रभावीतेवर परिणाम झाला आहे. अनेक वेळा प्रश्न विचारण्याची संधी कमी होते किंवा संपूर्ण प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा लागतो. परिणामी सरकारला थेट प्रश्न विचारण्याची आणि त्यांच्याकडून स्पष्टीकरण घेण्याची संसदीय प्रक्रिया कमजोर होते. संसदेमध्ये मतभेद असणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे; मात्र मतभेद व्यक्त करण्याची प्रक्रिया संसदीय नियमांच्या चौकटीत होणे आवश्यक असते. वारंवार होणाऱ्या व्यत्ययांमुळे महत्त्वाच्या सार्वजनिक विषयांवर चर्चा करण्यासाठी उपलब्ध वेळ कमी होतो. महागाई, बेरोजगारी, महिला सुरक्षा, शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या जनहिताच्या विषयांना अपेक्षित स्थान मिळण्यात अडचणी निर्माण होतात. काही वेळा सदस्यांकडून राजकीय भूमिका मांडण्याला अधिक प्राधान्य दिले जाते आणि प्रश्नोत्तराच्या तासाचा मूळ उद्देश म्हणजे शासनाच्या कामकाजाची माहिती घेणे व उत्तरदायित्व निश्चित करणे हा उद्देश दुय्यम ठरतो. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास अधिक प्रभावी करण्यासाठी संसदीय शिस्त, सदस्यांचा सक्रिय सहभाग आणि नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे.

**8.खासदारांची उपस्थिती**

संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींची सक्रिय उपस्थिती आणि सहभाग हा संसदेच्या प्रभावी कार्याचा महत्त्वपूर्ण घटक आहे. संसद ही केवळ कायदे मंजूर करणारी संस्था नसून जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करणारे, धोरणांचे परीक्षण करणारे आणि शासनाला उत्तरदायी ठेवणारे व्यासपीठ आहे. त्यामुळे खासदारांची नियमित उपस्थिती आणि सक्रिय सहभाग आवश्यक ठरतो. मात्र अलीकडील काळात काही खासदारांच्या संसदीय उपस्थितीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही सदस्य संसद अधिवेशनाच्या काळात मतदारसंघातील कामे किंवा इतर कारणांमुळे सभागृहातील कामकाजात नियमित सहभागी होत नसल्याचे दिसून येते. तसेच काही सदस्य सभागृहात उपस्थित असूनही चर्चांमध्ये, प्रश्नोत्तर प्रक्रियेत किंवा विधेयकांवरील चर्चेत सक्रिय सहभाग घेत नाहीत. लोकसभा ही जनतेच्या थेट प्रतिनिधित्वाची संस्था असल्याने सदस्यांचा प्रभावी सहभाग हा तिच्या कार्यक्षमतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. खासदारांनी केवळ उपस्थित राहणे पुरेसे नसून प्रश्न विचारणे, चर्चेत सहभागी होणे, समित्यांच्या कामात योगदान देणे आणि जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे आवश्यक आहे.

सतरावी लोकसभा (२०१९–२०२४) या कालावधीत कार्यरत होती. या काळात कोविड-१९ महामारीसह विविध कारणांमुळे संसदेच्या कामकाजावर परिणाम झाला. उपलब्ध आकडेवारीनुसार या लोकसभेत खासदारांची सरासरी उपस्थिती सुमारे ७९ टक्के होती.

यामध्ये:

- पुरुष खासदारांची सरासरी उपस्थिती – ७९ टक्के
- महिला खासदारांची सरासरी उपस्थिती – ७७ टक्के

अनेक खासदारांची उपस्थिती समाधानकारक असली तरी काही सदस्यांची कमी उपस्थिती ही संसदीय कार्यक्षमतेच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे.

**9.खासदारांचा चर्चेतील सहभाग**

खासदारांची उपस्थिती ही केवळ सभागृहात उपस्थित राहण्यापुरती मर्यादित नसून संसदीय चर्चेत सक्रिय सहभाग घेणेही महत्त्वाचे आहे. अभ्यासांनुसार अनेक सदस्य विधेयकांवरील चर्चा, सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवरील चर्चा आणि प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मर्यादित सहभाग घेत असल्याचे दिसून येते. लोकसभेच्या कामकाजासंदर्भातील एका अभ्यासानुसार ४८३ खासदारांच्या सहभागाचे विश्लेषण करण्यात आले. त्यामध्ये:

- सुमारे ४५.७६ % खासदारांनी ९० ते १००% बैठकींना उपस्थिती लावली.
- सुमारे ६३.९८ % खासदारांनी ७५ % पेक्षा अधिक उपस्थितीचा टप्पा गाठला.
- सुमारे १४.२९ % खासदारांची उपस्थिती ५०% पेक्षा कमी होती.

ही आकडेवारी दर्शवते की बहुतांश खासदारांची उपस्थिती समाधानकारक असली तरी काही सदस्यांचा मर्यादित सहभाग हा संसदीय कार्यक्षमतेसमोरील प्रश्न आहे.

सतराव्या लोकसभेत विविध राज्यांतील खासदारांनी प्रश्न विचारण्याच्या बाबतीत सक्रिय सहभाग नोंदविला. उपलब्ध माहितीनुसार महाराष्ट्रातील खासदारांनी मोठ्या प्रमाणावर प्रश्न विचारले असून त्यानंतर आंध्र प्रदेश आणि राजस्थान या राज्यांतील खासदारांचा क्रमांक लागतो. प्रश्न विचारणे हे खासदारांच्या संसदीय भूमिकेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. कारण प्रश्नांच्या माध्यमातून प्रशासनातील त्रुटी, धोरणांची अंमलबजावणी आणि जनतेच्या समस्या संसदेत मांडल्या जातात.

खासदारांच्या कमी सहभागाचे परिणाम

१. जनतेच्या प्रश्नांचे प्रभावी प्रतिनिधित्व कमी होते.

२. संसदीय चर्चेची गुणवत्ता प्रभावित होते.

३. सरकारच्या धोरणांचे परीक्षण मर्यादित होते.

४. संसदीय समित्यांचे कामकाज प्रभावीपणे होण्यात अडचणी निर्माण होतात.

५. लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यातील उत्तरदायित्वाची भावना कमी होऊ शकते.

**10.लोकप्रतिनिधींचे गुन्हेगारीकरण**

लोकशाही व्यवस्थेची गुणवत्ता ही केवळ निवडणुकांच्या नियमित आयोजनावर अवलंबून नसून निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या सामाजिक, नैतिक आणि सार्वजनिक जबाबदारीच्या जाणीवेवरही अवलंबून असते. मात्र भारतीय राजकारणातील वाढते गुन्हेगारीकरण ही गेल्या काही दशकांपासून गंभीर चिंता बनली आहे.

लोकप्रतिनिधींवर दाखल असलेले गुन्हेगारी खटले आणि गंभीर स्वरूपाचे आरोप यामुळे संसदीय संस्थांच्या प्रतिमेवर आणि जनतेच्या विश्वासावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी कायदे निर्मिती, धोरणनिर्मिती आणि जनहिताच्या प्रश्नांवर चर्चा करणे अपेक्षित असते. त्यामुळे अशा प्रतिनिधींची पार्श्वभूमी ही लोकशाहीच्या गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

Association for Democratic Reforms (ADR) या संस्थेने निवडणूक प्रतिज्ञापत्रांच्या विश्लेषणावर आधारित प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, अठराव्या लोकसभेत निवडून आलेल्या ५४३ खासदारांपैकी २५१ खासदारांनी (सुमारे ४६ टक्के) स्वतःवर गुन्हेगारी खटले असल्याचे जाहीर केले आहे.यामध्ये गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा समावेश असलेल्या प्रकरणांची संख्याही लक्षणीय आहे.

ADR च्या विश्लेषणानुसार:

| लोकसभा निवडणूक | गुन्हेगारी खटले जाहीर केलेले खासदार |
|---|---|
| २००४ | १२५ |
| २००९ | १६२ |
| २०१४ | १८५ |
| २०१९ | २३३ |
| २०२४ | २५१ |

वरील आकडेवारीवरून लोकप्रतिनिधींमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सदस्यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

**गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेले लोकप्रतिनिधी**

ADR च्या माहितीनुसार, अठराव्या लोकसभेतील अनेक खासदारांवर गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. यामध्ये:

- खून
- खुनाचा प्रयत्न
- बलात्कार
- अपहरण
- महिलांविरोधातील गुन्हे
- गंभीर स्वरूपाचे फौजदारी आरोप

यांचा समावेश आहे.

अशा प्रकारच्या प्रकरणांची उपस्थिती ही संसदीय संस्थांच्या नैतिकतेबाबत आणि लोकप्रतिनिधींच्या सार्वजनिक जबाबदारीबाबत प्रश्न निर्माण करते.

**राजकीय पक्षनिहाय स्थिती**

ADR च्या विश्लेषणानुसार विविध प्रमुख राजकीय पक्षांतील काही निवडून आलेल्या सदस्यांनी त्यांच्यावर गुन्हेगारी खटले असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे.

उदाहरणार्थ:

- भारतीय जनता पक्षाच्या २४० विजयी उमेदवारांपैकी ९४ उमेदवारांनी गुन्हेगारी खटले असल्याचे जाहीर केले.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ९९ विजयी उमेदवारांपैकी ४९ उमेदवारांनी अशा प्रकारची माहिती दिली.
- समाजवादी पक्षाच्या ३७ विजयी उमेदवारांपैकी २१ उमेदवारांनी गुन्हेगारी खटल्यांची माहिती दिली.

इतर पक्षांतील काही उमेदवारांनीही त्यांच्या प्रतिज्ञापत्रांमध्ये गुन्हेगारी प्रकरणांची माहिती जाहीर केली आहे.

**संसदीय लोकशाहीवरील परिणाम**

लोकप्रतिनिधींची गुन्हेगारी पार्श्वभूमी ही केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय नसून संसदीय लोकशाहीच्या गुणवत्तेशी संबंधित बाब आहे.

याचे पुढील परिणाम होऊ शकतात:

१. संसदीय संस्थांच्या विश्वासार्हतेवर परिणाम होतो.

२. लोकप्रतिनिधींच्या नैतिकतेबाबत प्रश्न निर्माण होतात.

३. जनहिताच्या प्रश्नांवरील चर्चेची गुणवत्ता प्रभावित होऊ शकते.

४. राजकारणातील स्वच्छ प्रतिमेच्या नेतृत्वाला मर्यादा येऊ शकतात.

५. नागरिकांचा लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी होण्याची शक्यता निर्माण होते.

**गुन्हेगारीकरण कमी करण्यासाठी उपाय**

१. गंभीर गुन्हे असलेल्या उमेदवारांच्या प्रकरणांची जलद न्यायालयीन सुनावणी करणे.

२. निवडणूक प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणणे.

३. राजकीय पक्षांनी उमेदवार निवडीमध्ये नैतिक निकषांचा विचार करणे.

४. मतदारांमध्ये जागरूकता वाढविणे.

५. राजकीय पक्षांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना उमेदवारी देण्याबाबत स्पष्टीकरण देणे.

**उपाययोजना**

1. भारतीय संसदेला वर्षभर पुरेसा कार्यकाल मिळणे आवश्यक आहे. कमी दिवसांचे अधिवेशन आणि मर्यादित चर्चेमुळे विधेयकांचे परीक्षण, धोरणांवरील चर्चा आणि सरकारच्या उत्तरदायित्वावर परिणाम होतो. त्यामुळे संसद अधिवेशनाचे किमान दिवस निश्चित करण्यासाठी स्पष्ट नियम तयार करणे आवश्यक आहे.

2. महत्त्वाची विधेयके अनिवार्यपणे संसदीय समित्यांकडे पाठविण्याची व्यवस्था निर्माण करावी. समित्यांना अधिक वेळ, तज्ज्ञांचे सहकार्य आणि प्रभावी अधिकार दिल्यास कायद्यांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.

3.संसदेत मतभेद असणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर गोंधळामध्ये होऊ नये. सदस्यांनी अभ्यासपूर्ण, तथ्याधारित आणि लोकहितावर आधारित चर्चा करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

4.प्रश्नोत्तराचा तास हा सरकारला उत्तरदायी ठेवण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. त्यामुळे वारंवार होणारे व्यत्यय टाळण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करणे, सदस्यांना अधिक प्रभावी प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि प्रश्नोत्तराचा तास नियमितपणे पार पाडणे आवश्यक आहे.

5. लोकशाहीमध्ये सशक्त विरोधी पक्ष हा सशक्त शासनव्यवस्थेसाठी आवश्यक असतो. विरोधी पक्षाने केवळ विरोधासाठी विरोध न करता सरकारच्या धोरणांचे वस्तुनिष्ठ परीक्षण करावे आणि पर्यायी धोरणे मांडावीत.

6.नवीन निवडून आलेल्या खासदारांना संविधान, संसदीय नियम, कायदेनिर्मिती प्रक्रिया आणि समिती कार्यपद्धती याबाबत नियमित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यामुळे संसदेमधील चर्चेची गुणवत्ता वाढेल.

7. संसदेत नियमित उपस्थिती, प्रश्न विचारणे, चर्चेत सहभाग आणि समितीच्या कामात योगदान यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. खासदारांच्या संसदीय कामगिरीचा सार्वजनिक अहवाल उपलब्ध करून देण्याची व्यवस्था विकसित करता येईल.

8. गंभीर गुन्हेगारी प्रकरणे असलेल्या उमेदवारांच्या निवडणूक प्रक्रियेबाबत अधिक कठोर नियम आवश्यक आहेत. राजकीय पक्षांनी उमेदवार निवडताना नैतिकता आणि सार्वजनिक विश्वास यांना प्राधान्य द्यावे.

9.राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणि नेतृत्व निवडीमध्ये व्यापक सहभाग वाढविणे आवश्यक आहे. मजबूत पक्षव्यवस्था ही प्रभावी संसदीय लोकशाहीसाठी महत्त्वाची आहे.

10.संसदीय लोकशाही केवळ संविधानिक तरतुदींवर चालत नाही तर संसदीय संस्कृती, परंपरा आणि नैतिक मूल्यांवरही आधारित असते. विरोधकांचा सन्मान, सहमती निर्माण करण्याची वृत्ती आणि लोकहिताला प्राधान्य देणे ही मूल्ये पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे.

## संदर्भसूची

**1-** कोठारी रजनी, 'Cast in Indian Politics*] 1967

2- **का"यप सुभाश : 'हमारी संसद'** National Book Trust] 2006

3- पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास (सं.) 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष', समकालीन प्रकाशन, 2007

4- बाळ प्रकाश, किशोर बेडकीहाळ (सं.) 'भारतीय राजकीय व्यवस्था : प्रक्रिया आणि स्वरूप' आंबेडकर अकादमी, सातारा, 2007

5- भोळे भास्कर, 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण'

6- रायकर दिनकर, 'खरच तमाशा करून दाखवा' दैनिक लोकमत, मंथन पुरवणी, मार्च, 2008

7- संपादकीय लेख 'तेच अधिवेशन तोच गोंधळ', दैनिक सकाळ, 3 मार्च, 2008

8- महाजन वैजनाथ, 'संसद सांभाळा', दैनिक पुढारी, बहार पुरवणी, 27 जुलै, 2008

9- दुभाषी पद्माकर, 'लोकशाहीची लक्तरे वेशीवर', दैनिक पुढारी, बहार पुरवणी, 27 जुलै, 2008

10- कामत धर्मानंद, 'संसद व्यवहाराची घसरण', दैनिक पुढारी, 1 सप्टेंबर, 2008

11- संपादकीय लेख 'लोकसभा – ये क्या हो रहा है?' दैनिक लोकमत, 21 जानेवारी,

16. https://www.rostrumlegal.com/decline-of-parliamentary-governance-indian-scenario/

17. https://ignited.in/index.php/jasrae/article/view/8931/17664

18. https://www.loksatta.com/politics/lok-sabha-parliament-and-vidhan-sabha-session-duration-has-shrunk-what-the-numbers-say-sdp-92-4896946/

19. https://ijlmh.com/paper/parliamentary-committees-examining-the-historical-evolution-significance-and-decline-in-modern-governance/?pdf=1

20. https://www.jurist.org/commentary/2020/09/punshi-yadav-curtailment-of-question-hour/

21. https://prsindia.org/parliamenttrack/vital-stats/participation-of-mps-in-the-17th-lok-sabha

22. https://adrindia.org/content/record-46-of-newly-elected-lok-sabha-mps-facing-criminal-cases